# **एस. एन. डी. टी. महिला** विद्यापीठ,

# **मुंबई - 400 020.**

आस्थापना/नस्ती-/2020 -21/ दि. एप्रिल १६, 2020

**तात्काळ व महत्वाचे**

**विषय : राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रदुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय**

**संदर्भ :**

1. मा. सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, यांचे कडील पत्र दि. 21.03.2020
2. मा. सचिव, विद्यापीठ, अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र. F. No. 1-14/2020 दि. 21.03.2020
3. शासन निर्णय क्र. संकिर्ण-2020/ प्र. क्र. 60/20/ तांशि-1 दि. 19.03.2020
4. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/कोरोना/मावि - 1/2020/3819/4042 दि. 19.03.2020
5. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. आरईजी/142/2019-20/437 दि. 19.03.2020
6. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. आस्थापना/नस्ती-/2020-21 दि. 22.03.2020
7. गृह विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्र. 40-3/2020/DM-I (A) दि. 24.03.2020
8. महसूल, वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. DMU/2020/CR. 92/DisM-1, दि. 25.03.2020
9. विद्यापीठ परिपत्रक क्र. आस्थापना//नस्ती-/2020-21 दि. 01 एप्रिल 2020
10. DMU/2020/C.R. 92/DisM -1/ dated 15th April 2020
11. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/कोरोना/2020/मवि-1/4091 दि. 15 एप्रिल 2020

## **परिपत्रक**

प्रति,

सर्व प्राचार्य, संचलित व संलग्नित महाविद्यालये, सर्व शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, संचालक, मान्यता प्राप्त संस्था, समन्वयक, प्रशासकीय अधिकारी, सर्व संबंधित शिक्षकेतर कर्मचारी ई.

उपरोक्त संदर्भाकित पत्राच्या अनुषंगाने एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग, संचलित व संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्थाकरीता संदर्भाधिन परिपत्रक क्र. 01 ते 08 अन्वये विद्यापीठाने कोरोना विषाणूच्या प्रसारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली आहेत व उपरोक्त परिपत्रकातील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे देखील सूचित केले आहे.

मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे उपरोक्त संदर्भ क्र. 10 अन्वये प्राप्त अधिसूचनेनुसार कोरोना विषाणूचे देशभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी तेवढ्याच तत्परतेने व तिव्रतेने खबरदारी घेणे व विविध प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करण्यासंदर्भात निर्देशित केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक 15 एप्रिल 2020 ते दि. 03 मे 2020 पर्यन्त कामकाज बंद (Lockdown) करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. तसेच संदर्भाकित मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. 11 च्या अनुषंगाने उपरोक्त अधिसूचनेतील संबंधित निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासंदर्भात विद्यापीठाला आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

तद्वतच उद्भवलेल्या परिस्थितिचे गांभिर्य लक्षात घेवून सर्व शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, प्राचार्य संचलित व संलग्नित महाविद्यालये, संचालक, मान्यता प्राप्त संस्था, प्रशासकीय अधिकारी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सूचित करण्यात येते की, दि. 15 एप्रिल 2020 ते दि. 03 मे 2020 पर्यंत विद्यापीठाचे प्रशासकीय व शैक्षणिक विभाग लॉकडाऊन मुळे बंद राहतील. तथापि या कालावधी दरम्यान अधिकारी व शिक्षकेतर कर्मचार्यांनी आपले घरी राहून (Work from Home) संबंधित

विभागाचे कामकाज करावे व त्याचा अद्ययावत अहवाल तयार करून ठेवावा व अधिसूचनेतील संबंधित निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

तथापि, आपत्कालिन परिस्थितीमधे संपर्क साधण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षक/ संशोधक/ अधिकारी/शिक्षकेतर कर्मचार्यांनी स्वतःचे भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल आईडी, संपर्क पत्ता आपल्या संबंधित विभाग प्रमुखाकडे सादर करावा. अत्यावश्यक सेवा (आरोग्य केंद्र, स्वच्छता विभाग, सामान्य प्रशासन विभाग, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग, पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा व इतर सेवा पुरविणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांनी या बाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे व अधिसूचनेतील संबंधित निर्देशांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी घेण्यात यावी.

या संदर्भात शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशांबाबत सर्व संबंधिताना आवगत करण्यात येईल.

(डॉ. दिपक देशपांडे)

कुलसचिव,

एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

**प्रत- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :**

प्राचार्य, संचलित व संलग्नित महाविद्यालये, सर्व शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, संचालक,मान्यता प्राप्त संस्था, समन्वयक, प्रशासकीय अधिकारी.